दिनांक 28/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.175

विटा नगरपरिषदेकडील सन 2024-2025 चा सुधारीत अर्थसंकल्प व सन 2025-2026 चा अनुमानित अर्थसंकल्प खालील प्रमाणे.

## सन 2024 – 2025 चा सुधारीत अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | 7,65,97,358/- |
| सन 2024 – 2025 ची जमा | 62,35,22,319/- |
| शिलकेसह एकूण जमा | 70,01,19,677/- |
| सन 2024 – 2025 चा खर्च | 69,97,04,177/- |
| अखेर शिल्लक | 4,15,500/- |

## सन 2025 – 2026 चा अनुमाणित अर्थसंकल्प

| | |
|---|---|
| आरंभिची शिल्लक | 4,15,500/- |
| सन 2025 – 2026 ची जमा | 124,52,39,000/- |
| शिलकेसह एकूण जमा | 124,56,54,500/- |
| सन 2025 – 2026 चा खर्च | 124,51,98,000/- |
| अखेर शिल्लक | 4,56,500/- |

सदरच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101(4) अन्वये मंजूरी देत आहे.तरी सदरचा अर्थसंकल्प मंजुरीसाठी मा.जिल्हाधिकारी सो, सांगली यांचे मान्यतेस्तव सादर करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.176

विषय – नगरपरिषद हद्दीतील विविध योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेल्या विकास कामांना मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 27/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विविध योजनेअंतर्गत हाती घेण्यात आलेली विकास कामे काही तांत्रिक अडचणीमुळे अपुर्ण राहिलेली आहेत. तरी सदर कामांची मुदत संपलेली असून हाती घेण्यात आलेली कामे पुर्ण करणे गरजेचे आहे,तरी सदर विकास कामांना मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

विकास कामाची योजना व नावे खालीलप्रमाणे,

**योजनेचे नाव - लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना –**

1. विटा नगरपरिषद हद्दीतील गणेश चौगुले घर ते दत्ता कांबळे घरापर्यंतचा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 11)
2. विटा नगरपरिषद हद्दीतील फुलेनगर मधील शहाजी कांबळे घर ते येरळा डेअरी पर्यंत आर.सी.सी. गटर करणे. (प्रभाग क्र. 11)
3. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर येथे जयसिंग चंदु भिंगारदेवे घर ते बापू ढोले घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे. (प्रभाग क्र.5)
4. नगरपरिषद हददीतील तासगांव नाका ते शिवसंगम मार्ग ओढयापर्यंत आर.सी.सी. गटर करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील तासगांव रस्ता ते सूभाष भिंगारदेवे घरापर्यंतचा रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी.गटर करणे. (प्रभाग क्र. 5)
6. विटा नगरपरिषद हद्दीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर येथे महादेव साबळे घर ते संजय कांबळे घरापर्यंत बंदिस्त गटर करणे व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. (प्रभाग क्र. 11)
7. नगरपरिषद हददीतील घोडके गल्ली येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण पेव्हिंग ब्लॉक बसविणे व आर.सी.सी. गटर करणे.
8. विटा नगरपरिषद हद्दीतील घुमटमाळ येथील बाळू चौगुले घर ते सखूबाई चव्हाण घरापर्यंतचा रस्ता ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर करणे. (प्रभाग क्र. 5)
9. विटा नगरपरिषद हद्दीतील घूमटमाळ येथील नगरपरिषद रस्ता ते तानाजी चौगुले घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे. (प्रभाग क्र. 5)

पान नं.2 वर

**योजनेचे नाव – महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना –**

1. विटा नगरपरिषद हद्दीतील मेटकरी वस्ती येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील सोनार गल्ली बोअरिंग ते गोविंद कचरे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.
3. विटा नगरपरिषद हद्दीतील जुना वासुंबे रोड येथील अतुल म्हेत्रे घर आणि ब्रम्हदेव बाबर घर ते अशोक जाधव घरापर्यंत आर.सी.सी. गटर व कॉंक्रिटीकरण करणे.
4. विटा नगरपरिषद हद्दीतील विकास जाधव प्लॉट ते मोरे सर घरापर्यंत रस्ता करणे.

तरी सदर विकास कामांना दि.31/3/2025 अखेर मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.177

विषय – नगरपरिषद हद्दीत बाजार वसुली (जागा वापर फी) करिता दिलेल्या मक्त्यास मुदतवाढ देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांची दिनांक 27/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.154, दिनांक.18/10/2023

3) महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 272 व 273.

4) दि.23/12/2023 रोजी प्रसिद्ध करणेत आलेली निविदा.

5) विटा नगरपरिषद पत्र जा.क्र.3546, दि.29/02/2024.

6) दि.07/02/2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा.

विटा नगरपरिषद हद्दीत भाजी विक्रेते/किरकोळ व्यवसायिक आपला शेतीमाल विक्री करण्यासाठी /व्यवसाय करण्यासाठी नगरपरिषद हद्दीतील जागेचा (भाजी मंडई, रस्ते) वापर करीत असतात. याकामी दैनंदिन बाजार/आठवडी बाजार या दिवशी नगरपरिषदेच्या मालकीचे ओटे/कट्टे, खाद्य विक्री स्टॉल, फळ विक्रेते, फेरीवाले, खाटधारक यांचेकडून बाजार फी वसुली केली जाते.

महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 272 मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र. 2 मधील ठरावानुसार बाजार वसुलीचे दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर र.रु. |
|---|---|---|
| 1 | मोकळी जागा 5 फुट X 5 फुट | 10/- |
| 2 | 5 फुट X 5 फुट पेक्षा जास्त असल्यास | 20/- |
| 3 | फळ विक्रेते धारक | 30/- |
| 4 | खाट धारक | 30/- |
| 5 | हातगाडे धारक | 30/- |
| 6 | खाद्य स्टॉल/गाडे | 30/- |
| 7 | 3/4 चाकी गाडीतून माल विक्रेते | 30/- |

पान नं.2 वर

संदर्भ क्र.4 नुसार दैनंदिन बाजार वसुली करण्याकरिता महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 273 (1) नुसार र.रु.30,00,000/- मात्र या आधारभूत किमतीवर 1 वर्षासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त निविदामधून ज्या निविदाधारकाने आधारभूत किमतीपेक्षा जास्त रकमेची निविदा भरली होती त्याची निविदा मंजूर करून संदर्भ क्र.5 नुसार श्री.गजानन रामचंद्र निकम यांना कार्यादेश देण्यात आला होता.

सदर निविदेची मुदत ही दि.28/02/2025 रोजी संपणार असल्याने संदर्भ क्र.6 नुसार पुढील वर्षासाठी नवीन निविदा मागील वर्षीच्या आधारभूत किमतीमध्ये (र.रु.30,00,000) 10 % वाढ करून म्हणजे एकूण र.रु.33,00,000/- किंमत ठेवून प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु सदर निवेदेसाठी फक्त 1 निविदाधारक यांनी निविदा भरल्याने सदर निविदेस मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यास विलंब लागणार आहे.

तरी सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील मक्तेदार श्री.गजानन रामचंद्र निकम यांना करारपत्रकात नमूद अटी व शर्तीनुसार सदर बाजार वसुली करणेच्या कामास मुदतवाढ देणे आवश्यक आहे. सदर मुदतवाढीदरम्यान महिन्यानुसार (1 महिन्याची रक्कम = मंजूर निविदा रक्कम/12 महिने) अशी रक्कम नगरपरिषदेकडे रोखीने किंवा धनादेशाद्वारे भरणे आवश्यक आहे.

तरी सदर कामाची नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जुन्या निविदेस मुदतवाढ देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.178

विषय – मे.साई गणेश एंटरप्रायझेस यांना मंजूर निविदेतील शहरातील गोळा केलेला कचरा शहरापासून कचरा डेपो पर्यंत वाहतूक करणेकामी वाहनांना लागणारे इंधन पुरवठा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरिक्षक यांची दिनांक 27/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.63, दि.02/11/2023.
3) मा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली यांचे पत्र जा.क्र.तांशा-2/विटा/घनकचरा ता.मा/2021/2023, दि.05/12/2023.
4) दि.15/03/2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा.
5) मे.साई गणेश एंटरप्रायझेस यांना दिलेला कार्यादेश जा.क्र.1610, दि.08/08/2024.

उपरोक्त संदर्भ क्र.2 नुसार नगरपरिषद हद्दीत दैनंदिन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी जाऊन घरगुती, वाणिज्य, शासकीय कार्यालय व शाळा यामंधील वर्गीकृत घनकचरा संकलन करणे, रस्त्यांची झाडलोट करणे, शहरातील गटारी साफ करणे, औषध फवारणी, नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक शौचालय साफ करणे याबाबत निविदा मागविणेकामी प्रशासकीय ठराव करण्यात आला होता.

संदर्भ क्र.3 अन्वये त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास मा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली यांचेकडून तांत्रिक मान्यता घेण्यात आली होती. संदर्भ क्र.4 नुसार सदर कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या अनुषंगाने प्राप्त निविदांमधून मे.साई गणेश एंटरप्रायझेस हे पात्र ठरलेने त्याना संदर्भ क्र.5 नुसार कार्यादेश देणेत आला होता. त्यानुसार मे.साई गणेश एंटरप्रायझेस यांनी सदर कामकाज सुरु केले होते.

परंतु सदर निविदेचे कामकाज करत असताना अदा करण्यात आलेल्या देयकामध्ये गोळा केलेला कचरा शहरापासून कचरा डेपो पर्यंत वाहतूक करणेकामी वाहनांना लागणारे इंधन याचा खर्चाचा समावेश नसलेबाबत मे.साई गणेश एंटरप्रायझेस यांनी लेखी पत्रान्वये कळविले आहे.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.3 अन्वये प्राप्त तांत्रिक मंजुरीमधील घटकांची तपासणी केली असता त्यामध्ये abstract item no.1 मध्ये collection of waste within municipal council limits म्हणजे नगरपरिषद हद्दीमध्ये घनकचरा संकलन करणे हा घटक अंतर्भूत असल्याचे आढळून आले. परंतु यामध्ये शहर हद्दीतील संकलन (गोळा) केलेला कचरा शहर हद्दीपासून ते घनकचरा डेपो पर्यंत (अंदाजे अंतर 10 km) वाहतूक करणेकामी लागणारे इंधनाच्या खर्चाचा समावेश नसलेचे आढळून आले.

पान नं.2 वर

त्यामुळे मे.साई गणेश एंटरप्रायझेस यांनी मागणी केलेप्रमाणे शहर हद्दीपासून ते घनकचरा डेपो पर्यंत वाहनाद्वारे (घंटागाडी,ट्रॅक्टर व इतर वाहने) वाहतूक करणेसाठी प्रतिदिन लागणारे इंधन नगरपरिषद फंडातून 1 मार्च 2025 पासून पुरवठा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/02/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.179

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर मधील नागेश भिंगारदेवे घर ते रामचंद्र तुपे ते प्रसाद भिसे घर ते संजय भिंगारदेवे घरापर्यंत अंडरग्राऊंड गटर करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 28/02/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नेहरुनगर येथील नागेश भिंगारदेवे घर ते रामचंद्र तुपे ते प्रसाद भिसे घर ते संजय भिंगारदेवे घरापर्यंत आर.सी.सी. अंडरग्राऊंड गटर करणेकामी तेथील नागरीकांची मागणी असून सदरचे काम केल्याने तेथील नागरीकांची सांडपाण्याची गैरसोय होणार नाही. तरी सदरचे काम गरजेचे आहे. या कामाचे अंदाजपत्रक र.रू. 7,68,539/- इतके झाले असून सदरचे काम नगरपरिषद फंडातून करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा